# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

Contact No. 0721-2660947 Mob. No. 99229 30166 email - avinashasnare@sgbau.ac.in

क्र. संगाबाअवि/१३/१७/२०१८
दिनांक : ३१.०१.२०१८

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : सत्र २०१७-२०१८ मधिल स्पर्धक कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचे कलर कोट व मोनो महाविद्यालयीन हिस्स्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ क्रीडा व सांस्कृतिक क्रीया नियम हस्तपुस्तिकेतील तरतूद क्र.**12.CUPS, SHIELDS, COLOURS AND CERTIFICATES** मधिल तरतूद क्र.**ii)** चे नुसार दरवर्षी जे विद्यार्थी कलावंत व साथीदार आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतात व ज्या महाविद्यालयीन शिक्षकांना सदर चमूंचे व्यवस्थापक म्हणून नियुक्त करण्यात येते अशा सर्व विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांना प्रथमवर्षी कलर कोट व मोनो देण्यात येतो. ज्यांची चमूत पुन्हा निवड झाली असेल अशा खेळाडू विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांना केवळ मोनोच देण्यात येतो.

विद्यापीठ नियमानुसार विद्यापीठ युवा महोत्सव चमूतील विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचे कलर कोट व मोनोची रक्कम महाविद्यालय व विद्यापीठ यांचेवर समप्रमाणात विभागणी करण्यात आली आहे. त्याप्रमाणे सत्र २०१७-२०१८ मध्ये प्रथमतः निवड झालेल्या विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचे कलर कोट व मोनोकरीता एकूण किंमत **रुपये २,६००/- (अक्षरी रुपये दोन हजार सहाशे फक्त)** निश्चित झाली असून त्यानुसार महाविद्यालय हिस्सा व विद्यापीठ हिस्सा प्रत्येकी **रुपये १,३००/- (अक्षरी रुपये एक हजार तीनशे फक्त)** विद्यापीठास **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचे नांवे काढलेल्या बँक डिमांड ड्रॉफ्ट व्दारे किंवा धनादेशाव्दारे **दिनांक २५ फेब्रुवारी, २०१८** पर्यंत जमा करावा व जमा करण्यात आलेल्या रकमेबाबतची पावती **संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांचे कार्यालयात पाठविण्यात यावी.

सत्र २०१७-२०१८ करीता विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूमध्ये प्रथमतः निवड/नियुक्ती झालेल्या विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांनी कलर कोट करीता मापे दिली नाहीत, त्यांनी मे.गाला एन्टरप्राईज, amtgala@gmail.com (भ्रमणध्वनी क्र.०९४२३१२३२०८) बी-३, राम लक्ष्मण संकुल, शिव कारगो, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय जवळ, अमरावती येथे मापे देण्यात येवून कलर कोटव मोनो **दिनांक २५ मार्च, २०१८** पर्यंत संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयातून प्राप्त करावेत. त्यानंतर त्यांना कोणत्याही सबबीवर कलर कोट व मोनो देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ.अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपी माहितीकरीता सादर :-**

०१. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.